महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in ; desk7@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

क्र:७/सीटीएस/ ड्युअल डिग्री प्रोग्राम /२०२२/ ४५१
दिनांक:- ११.११.२०२२

प्रति,
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय-: जर्मनी ड्युअल डिग्री प्रोग्राम बाबत अवेअरनेस वर्कशॉप आयोजित करण्याबाबत.

संदर्भ-: श्री.कवी लुथरा, CMD, Leo's Sagittarius Consulting (OPC) Private Limited (L&S) यांचेकडून दिनांक २७ ऑक्टोबर २०२२ रोजी प्राप्त ई-मेल

१. उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, जर्मनी ड्युअल डिग्री प्रोग्राम बाबत प्रशिक्षणार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यास परवानगी मिळणेबाबतचा संदर्भीय ईमेल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. संदर्भीय ईमेल सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

२. Leo's Sagittarius Consulting (OPC) Private Limited (L&S) ही एक आंतरराष्ट्रीय गतिशीलता संस्था आहे ज्याचा उद्देश उद्योग, शैक्षणिक संस्था/विद्यापीठे आणि शासन यांच्यासाठी एक व्यासपीठ तयार करून विद्यार्थी समुदायाला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचे उद्दिष्ट आहे, विद्यार्थ्यांसाठी जागतिक रोजगाराच्या संधींसाठी प्रमुख सक्षमक म्हणून आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे.

३. तसेच देशातील होतकरू पदवीधरांच्या रोजगारक्षमतेत सुधारणा करण्यासाठी सदर आस्थापना जर्मनी, फ्रान्स,जपान, ऑस्ट्रेलिया, यूएसए आणि इतर सारख्या विकसित देशांच्या संस्कृती, कामाचे वातावरण आणि नवीनतम तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करतात. सदर कंपनीने यासंदर्भात जर्मनी या देशासमवेत भागीदारीद्वारे ड्युअल डिग्री प्रोग्राम सुरू केला आहे. हा कार्यक्रम एक अप्रेंटिसशिप एम्बेडेड पदवी कार्यक्रम आहे जो अंतिम प्लेसमेंट / रोजगाराकडे नेतो. अॅप्रेंटिसशिप दरम्यान उमेदवारांना सरासरी स्टायपेंड अंदाजे १२,००० · (युरो) प्रति वर्ष प्राप्त होते.असे संदर्भिय इमेल मध्ये नमूद आहे.

४. जर्मनी ड्युअल डिग्री प्रोग्राम विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आपले विभागातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय/खाजगी तांत्रिक विद्यालय केंद्र येथे कार्यशाळा आयोजित करण्यासाठी श्री.कवी लुथरा, CMD, L & S Consulting (OPC) Pvt Ltd. यांना परवानगी देण्यात आली आहे.

५. त्यानुसार आपले विभागातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय व खाजगी तांत्रिक विद्यालय केंद्र येथे जर्मनी ड्युअल डिग्री प्रोग्राम बाबत जागरूकता

कार्यशाळा आयोजित करण्यासाठी कवी लुथरा, CMD, L & S Consulting (OPC) Pvt Ltd यांना आवश्यक हॉल उपलब्ध करून देणे तसेच इतर सहकार्य करण्याबाबत आपले स्तरावरून सूचित करण्यात यावे.

(दि. अं. दळवी)
संचालक

प्रत-: श्री.कवी लुथरा, CMD, Leo's Sagittarius Consulting (OPC) Private Limited (L&S) यांना माहितीसाठी